D:\GUG 2020\GUG\GUG 2020\I ARII ATRAK 2019-20\I aripatrak2021\I aripatrak2021.Docx

# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचनाक्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना विभाग)**

एम. आय. डी.सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५
email :- gug.registrar@gmail.com दुरध्वनी क्र. ०७१३२-२२३१०४ email:- gondwanaesst@gmail.com

जा.क्र. गो.वि./आस्था./ ४३२७/२०२१ दि. ०५ /०४/२०२१

## परिपत्रक

संदर्भ :- मा. जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर यांचे कार्यालयीन आदेश क्र. एमएजी/कार्या-८/टे.३/सांले/२०२१/३९२ दि. ०४/०४/२०२१.

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित चंद्रपूर जिल्हातील सर्व महाविद्यालयांचे मा. प्राचार्य यांना याद्वारे कळविण्यात येते की, कोरोना विषाणूचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता व सदर विषाणूचा प्रसार व प्रभाव यामध्ये वाढ होऊ नये त्याअनुषंगाने मा. जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर यांचे कार्यालयीन आदेश क्र. एमएजी/कार्या-८/टे.३/सांले/२०२१/३९२, दि. ०४/०४/२०२१ नुसार कार्यवाही घेऊन अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

संलग्नित - संदर्भिय आदेशाची पत्र.

5/4/2021
(डॉ. अनिल चिताडे)
कुलसचिव(प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रतिलिपी माहितीस्तव व आवश्यक कार्यवाहीस्तव सविनय सादर:-

१. मा. कुलगुरु यांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. जिल्हाधिकारी यांचे कार्यालय, चंद्रपूर जि. चंद्रपूर.
३. मा. प्र-कुलगुरु यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
४. मा. प्राचार्य, चंद्रपूर जिल्ह्यातील संलग्नित सर्व महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
५. सिस्टीम ॲनालिस्ट, संगणक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली, सदर परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रकाशित करण्याच्या कार्यवाहीस्तव.
६. आस्थापना विभाग(नस्ती), गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

5.4.2021
(डॉ. विजय सिल्हारे)
उपकुलसचिव (आस्थापना व प्रशासन)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन

महसूल विभाग

# जिल्हा दंडाधिकारी चंद्रपूर यांचे कार्यालय

ई-मेल : chandrapur.rdc@ gmail.com

क्रमांक.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2021/392

दुरध्वनी क्रमांक- 07172-250659

दिनांक : 04 एप्रिल, 2021

वाचा :- 1. साथरोग कायदा, 1897

2.आपत्ती व्यवस्थापन कायदा, 2005 चे कलम 30, 33, 34, 41 व कलम 51

3. फौजदारी प्रक्रिया संहिता, 1973

4. मा. मुख्य सचिव, महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन आदेश क्र. डीएमयु/ 2020/ सीआर,92/DisM-1 दि. 15/03/2021

5. या कार्यालयाचे आदेश क्र.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2021/314 दि. 16.03.2021

6. मा. मुख्य सचिव, महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन आदेश क्र. डीएमयु/ 2020/ सीआर,92/DisM-1 दि. 27/03/2021

7. या कार्यालयाचे आदेश क्र.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2021/373 दि. 27.03.2021

8. या कार्यालयाचे आदेश क्र.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2021/390 दि. 31.03.2021

9. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांचे प्रस्ताव क्र.जिपचं/शिक्षण (माध्य.) /आस्था/722/2021 दि. 01.04.2021.

10. या कार्यालयाचे आदेश क्र.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2021/391 दि. 01.04.2021

## : : आदेश : :

ज्याअर्थी, संदर्भ क्र. 10 चे आदेशान्वये, चंद्रपर जिल्हयातील सर्व व्यवस्थापनाच्या व सर्व माध्यमाच्या शाळेतील **इयत्ता 5 वी ते 9 वी व इयत्ता 11 वी चे वर्ग तात्पुरते स्वरुपात दि. 05.04.2021 ते दि. 30.04.2021 या कालावधीकरीता बंद ठेवण्याबाबत आदेश निर्गमीत करण्यात आलेला आहे.**

आणि ज्याअर्थी, कोरोना विषाणूचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता व सदर विषाणूचा प्रसार व प्रभाव यामध्ये वाढ होऊ नये म्हणुन चंद्रपूर जिल्हयातील सर्व व्यवस्थापनांतर्गत व माध्यमांचे वरीष्ठ महाविद्यालय, तंत्रनिकेतन, अभियांत्रिकी महाविद्यालय, अभिमत विद्यालये, कौशल्य विकास प्रशिक्षणांतर्गत असलेले वर्ग सुध्दा उपरोक्त कालावधीत बंद ठेवणे आवश्यक झालेले आहे.

**त्याअर्थी, मी, अजय गुल्हाने, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, चंद्रपूर** असे आदेशीत करतो की, **चंद्रपर जिल्हयातील सर्व व्यवस्थापनांतर्गत व सर्व माध्यमांचे वरीष्ठ महाविद्यालय, तंत्रनिकेतन, अभियांत्रिकी महाविद्यालय, अभिमत विद्यालये, कौशल्य विकास प्रशिक्षणांतर्गत असलेले वर्ग तात्पुरते स्वरुपात दि. 05.04.2021 ते दि. 30.04.2021 या कालावधीकरीता बंद राहतील** तसेच खालील सुचनाचे यथोचितरित्या पालन करणे आवश्यक राहील.

- उपरोक्त प्रमाणे शैक्षणिक वर्ग केवळ ऑनलाईन सुरु ठेवण्यास परवानगी राहील.
- शिक्षक/प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी नियमित आवश्यकतेनुसार महाविद्यालयात उपस्थित राहतील.
- शिक्षक/प्राध्यापक महाविद्यालयात येऊन ऑनलाईन वर्ग घेतील तसेच 12 वी बोर्ड किंवा महाविद्यालयीन परीक्षेकरीता शासनाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार काम करतील.
- राज्य शासन व जिल्हा प्रशासनाने कोव्हीड-19 च्या अनुषंगाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशाचे पालन करणे बंधनकारक राहील.

सदर आदेशाची कोणतेही व्यक्ती, संस्था आणि संघटना यांनी अंमलबाजवणी करण्यास टाळाटाळ केल्यास अथवा विरोध दर्शविल्यास संबंधीताविरुध्द आपत्ती व्यवस्थापन कायदा, 2005 चे कलम 51 ते 60 व भारतीय दंड संहिता कलम 188 तसेच साथरोग कायदा 1897 अन्वये दंडनीय/कायदेशीर कार्यवाही संबंधीत पोलीस अधिकारी/ कर्मचारी यांनी करावी. सर्व संबधित प्रशासकीय विभाग प्रमुख यांनी उपरोक्त आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

**सदरचा आदेश दिनांक 04.04.2021 रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिलेला आहे.**

सही/-
(अजय गुल्हाने)
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, चंद्रपूर**

प्रतिलीपी :- **माहितीस सविनय सादर.**

1. मा. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर
   **माहितीस तथा उचित कार्यवाहीस्तव.**
2. कुलगुरु, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली ता.जि. गडचिरोली
3. पोलीस अधिक्षक, चंद्रपूर
4. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर
5. आयुक्त, चंद्रपूर शहर महानगरपालीका, चंद्रपूर
6. जिल्हा माहिती अधिकारी, चंद्रपूर
7. उपविभागीय दंडाधिकारी (सर्व)
8. शिक्षणाधिकारी (प्राथ./माध्य.) जिल्हा परिषद, चंद्रपूर
9. तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी (सर्व)
10. संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व)
11. मुख्याधिकारी, नगर परिषद/नगर पंचायत (सर्व)

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, चंद्रपूर**

Scanned with CamScanner